ISSN 2231-1629
Knowledge Resonance
● Vol-9 No. 2 ● July-December 2020

# अर्थशास्त्राच्या अभ्यासातील आगमन व निगमन पध्दती : एक विश्लेषणात्मक अध्ययन

**प्रा. मनोहर आनंदराव गुडधे**
सहयोगी प्रा. अर्थशास्त्र विभाग
चिंतामणी महा. पोंभुर्णा

जगातील भौतीक गोष्टीचा अभ्यास विज्ञानाद्वारे करून त्या गोष्टीचा उपयोग मानवी जीवनात करण्यात येत असतो. म्हणूनच मानवी जीवनात शास्त्र किंवा विज्ञानाचे महत्व हे अनन्य साधारण असेच आहे. अनेक गोष्टीचा शोध हा संशोधनातून लागलेला आहे. भौतीक गोष्टीचे शास्त्राद्वारे ज्ञान प्राप्त केले जाते. म्हणजेच वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब करून त्या गोष्टीचे संशोधन केले जाते. संशोधनातून त्या गोष्टीचे वस्तुनिष्ठ ज्ञान प्राप्त होते. यावरून हे स्पष्ट होते की, विज्ञान म्हणजेच शास्त्र ही संशोधन किंवा अध्ययनाची पध्दत आहे.

मानवाच्या अनुभव कक्षेत येणारा कोणताही विषय हा शास्त्राचा अभ्यास विषय होऊ शकतो. त्यामुळे मानवाच्या सामाजिक जीवनाचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करणाऱ्या सर्व विषयांचा समावेश समाजिक शास्त्रात केला जातो. सामाजिक विषयाचा अभ्यासविषय हा मानव आहे. मानवसमाजाचे स्वरूप हे गतीमान व गुतांगंतीचे असते. समाजातील विविध गट, समुह, वर्ग निरनिराळया प्रेरणांनी प्रभावित झालेले असतात. असे असले तरीही सामाजिक गोष्टीचा संबध हा विज्ञानाशी येत असतो. कोणत्याही सामाजिक घटनेचे वैज्ञानीक दृष्टिकोणातुन अध्ययन करता येते. नैसर्गिक शास्त्रा प्रमाणे सामाजिक शास्त्रातही नियमित संशोधन होत असते. सामाजिक शास्त्रे ही मानवी समाजाचे शास्त्रीय पध्दतीने अध्ययन करणारे मानवतावादी स्वरूपाचे शास्त्र आहे. त्यामुळे सामाजिक शास्त्रे हे केवळ तत्वनिष्ठतेवर आधारलेले व्यवहार उपयोगीतेवर अंवलबून आहे. सामाजिक घटना – घडामोडीतील सत्य शोधून काढण्यासाठी सामाजिक शास्त्रांनी शास्त्रीय अभ्यास पध्दतीचा मार्ग स्विकारला आहे.

**अर्थशास्त्र अध्ययनाच्या पध्दती** :– कोणत्याही शास्त्रातील अध्ययनाचे उद्दिष्ट हे कार्यकारणभाव व परिणामांचे स्पष्टीकरण करणे असतो. इतर शास्त्राप्रमाणे अर्थशास्त्रात सुध्दा आर्थिक घटनांच्या कार्यकारण अध्ययनाचे स्पष्टीकरण केले जाते. तसेच आर्थिक नियम तयार केले जातात. अर्थशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र आहे. यामध्ये समाजाच्या दैंनदिन व्यवहाराशी निगडीत आर्थिक सिध्दांत समाविष्ट असतात. हे सिध्दांत इतर नैसर्गिक शास्त्राच्या सिध्दांता प्रमाणे शास्त्रीय पध्दतीवर आधारलेले असतात. आर्थिक प्रश्नांची उकल करणे, अर्थशास्त्रीय सिध्दांत भांडणे, अर्थव्यवस्थेच्या विकासाचा अभ्यास करणे इ. उद्देशाने आर्थिक विश्लेषणाच्या पध्दती वापरल्या जातात.

अर्थशास्त्र हे सुध्दा एक विज्ञान किंवा शास्त्र आहे. इतर शास्त्रातील नियमाप्रमाणे अर्थशास्त्रातील नियम किंवा सिध्दांत हे आर्थिक नियम किंवा आर्थिक सिध्दांत या नावाने ओळखले जातात. आर्थिक नियम हे आर्थिक घटकांने कार्यकारण व परिणाम यांच्यातील संबध व्यक्त करीत असतात. आर्थिक नियम तयार करतांना काही विधी किंवा पध्दतीचा अवलंब करण्यात येत असतो. आर्थिक नियम करतांना ज्या पध्दतीचा, प्रकियेचा किवा प्रणालीचा उपयोग केला जातो तिला आर्थिक अध्ययनाची पध्दती म्हटली जाते. या संबधात कोसा या शास्त्राज्ञाचे मत विचारात घेण्यासाखे आहे. ते म्हणतात. ''विधी अथवा पध्दती या शब्दाचा अर्थ असा तर्कपुर्ण प्रणालीशी आहे की, जीचा प्रयोग सत्यतेचा शोध किंवा ते व्यक्त करण्यासाठी केला जातो.

आर्थिक नियमांची रचना करण्यासाठी ज्या विधी किंवा पध्दतीचा उपयोग केला जातो. त्यांना आर्थिक अध्ययनाच्या पध्दती असे म्हणतात. अर्थशास्त्र हे अर्थव्यवस्थेच्या दैंनदीन कामकाजाचे निरीक्षण करीत असते. त्या निरक्षणातून तथ्यांच्या संदर्भात गुहीतके मांडली जातात. त्या गुहीतकांची अनुभवसिध्द पडताळणी केल्यावर गृहीतक सिध्द झाल्यास त्यावरून अर्थशास्त्रीय सिध्दांत मांडले जातात. व ते सर्व समाजाला लागु केले जातात. अर्थशास्त्राच्या या शास्त्रीय पध्दतीत अर्थ व्यवस्थेचे निरीक्षण करणे, गुहीतकांची मांडणी करणे, तथ्य संकलन व विश्लेषण, गृहितकांची पडताळणी किंवा परिक्षण, आर्थिक सिध्दांताची मांडणी करणे व शेवटी आर्थिक सिध्दांत लागु करणे या महत्वपुर्ण टप्यांचा समावेश होतो.

आर्थिक विचारांच्या इतिहासावरून अर्थशास्त्राच्या अध्ययनाच्या विभीन्न पध्दतीची माहिती मिळते. वेगवेगळया अर्थशास्त्रज्ञानी अर्थशास्त्राची विभीन्न उद्दिष्टये सांगितल्यामुळे त्यांनी आर्थिक अध्ययनासाठी वेगवेगळया अध्ययन पध्दतीचा अवलंब केला आहे. अध्ययनाच्या उद्दिष्टनुसार आगमन व निगमन या पध्दती

शिवाय अ) मानस शास्त्रीय पध्दती ब) संस्थात्मक पध्दती क) अंकगणित पध्दती ड) स्थैतीक पध्दती ई) प्रावैगीक पध्दती फ) सुक्ष्म पध्दती य) स्थुल पध्दती इ. प्रकार आहेत.

**आगमन पध्दती (Inductive Method):—**

आगमन पध्दतीला विगमन पध्दती असेही संबोधले जाते. या पध्दतीचा विकास जर्मन संप्रदायाने केला आहे. या पध्दतीत आर्थिक विश्लेषण करतांना मानवी व्यवहारातील अनेक घटनांचे निरिक्षण करून तीचा अभ्यास केला जातो. या पध्दतीत विशेषत्वाकडून सामान्यत्वाकडे जाण्याची प्रवृत्ती असते. निरिक्षण व प्रयोग ही या पध्दतीची मुख्य साधने आहेत. या सांधनाचा वापर करून निष्कर्ष काढले जातात. या पध्दतीच्या वापरातून निघालेल्या निष्कर्षाला अनूभवजन्य पुराव्याचा आधार असतो म्हणून या पध्दतीला अनुभवनिष्ठ पध्दती असेही म्हणतात.

अर्थशास्त्रात आगमन पध्दतीचा उपयोग ऐतिहासीक संप्रदायाने केला. त्यामुळे या पध्दतीला ऐतिहासिक पध्दती असेही म्हटले जाते. या पध्दतीत विशिष्ट प्रकारच्या वास्तविक किंवा ऐतिहासिक तथ्यांचे अवलोकन करून किंवा अध्ययन करून त्या आधारे सामान्य निष्कर्ष काढले जातात. त्यानंतर प्रयोगशाळेमध्ये आलेल्या निष्कर्षाची तपासणी केली जाते. या संबधात मागणीच्या नियमाचे उदाहरण देता येईल. बाजारात एखाद्या वस्तुची किंमत कमी झाली तर त्या वस्तूची मागणी वाढत असते. यासंबधी निरिक्षण अनेक प्रकारे करता येईल बाजारात साखर, गहू, तांदुळ इ. वस्तुच्या किमतीतील घटीचा त्या वस्तुच्या मागणीवर काय परिणाम होतो. याचे अध्ययन करावे लागले. जर विशिष्ट वस्तुच्या अध्ययनावरून किंमत कमी झाली असता मागणी वाढते असे आढळले तर त्या आधारे सामान्य सिध्दांत प्रतीपादन केला जातो.

आगमन पध्दतीमध्ये विशिष्ठ घटकावर विशिष्ट परिस्थितीत प्रयोग करून निष्कर्श काढले जातात. यात व्यवहारातील घटकाचे निरिक्षण करून निष्कर्ष काढले जातात व ते निष्कर्श इतर घटकांना लागु करून त्या द्वारे सामान्य निष्कर्श काढले जातात. अर्थतज्ञानी विगमन पध्दतीचे दोन विभागात वर्गीकरण केलेले आहे. ते पूढील प्रमाणे आहेत.

**अ) प्रयोगात्मक पध्दती :—**

विशिष्ट घटकावर विशिष्ट परिस्थितीत प्रयोग करून निष्कर्ष काढले जातात. तेव्हा त्यास प्रयोगात्मक पध्दती म्हणतात.

**ब) सांख्यिकीय पध्दती :—**

या पध्दतीमध्ये क्षेत्रामधूनच आकडेवारी जमा केली जाते व त्यावरून त्याचे वर्गीकरण करून निष्कर्ष काढले जातात. यासाठी वेगवेगळया संख्याशास्त्र सुत्राचा वापर केला जातो.

**आगमन पध्दतीच्या पायऱ्या :—**

आगमन पध्दतीच्या चार पायऱ्या आहेत त्या पुढील प्रमाणे आहेत.

**अ) समस्येची निवड करणे :—**

संबधीत अर्थशास्त्रीय परिस्थितीचे सामाण्यीकरण करण्यासाठी सर्वप्रथम समस्येची योग्य पध्दतीने निवड केली जाते.

**ब) सामग्री जमा करणे :—**

समस्ये संबधीत माहिती व आकडेवारी जमा करणे व त्याच माहितीचे आधारावर वर्गीकरण व विश्लेषण करणे.

**क) निरिक्षण** :— समस्येशी संबधीत विशेष तथ्याचे निरिक्षण करणे.

**ड) सर्वसामान्य नियमांची मांडणी करणे :—**

निरिक्षणाच्या आधारावर सामान्यीकरण केले जाते. त्यामुळे विशेष घटकापासुन सामान्य सत्य प्रस्थापीत केले जाते. जर्मनीतील ऐतिहासिक संप्रदायानी अर्थशास्त्रीय विवेचनासाठी ही पध्दती वापरली आहे. या पध्दतीचा भर वास्तविकतेवर असल्यामुळे जगातील बदलत्या परिस्थितीतील समस्यांचा विचार यात केला जाते. तसेच या पध्दतीत सभोवतालच्या परिस्थितीचे अवलोकन करून जे अनुभव आलेले असतात, त्या आधारावर सिध्दांत मांडले जातात. तसेच आगमन पध्दतीमध्ये सांख्येकीय पध्दतीचा उपयोग करण्यात येतो. त्यामुळे आर्थिक प्रश्नांच्या विश्लेषणात सुधारणा घडवून आणता येते. विशेष करून या पध्दतीचा उपयोग हा दारिद्रय निर्मुलन, आर्थिक विषमता, मागासलेपणा इत्यादी समस्या सोडविण्याच्या दृष्टिने धोरण तयार करतांना शासन व प्रशासनाला होत असतो.

**निगमन पध्दती (Deductive Methode) :—**

सामान्यत्वाकडुन विशेषत्वाकडे जाण्याची प्रवृत्ती असलेल्या अर्थशास्त्रातील निगमन पध्दतीलाच अमुर्त पध्दती, काल्पनिक पध्दती, समिश्र विवेकशील पध्दती व विश्लेषनात्मक पध्दती इ. विविध नावाने ओळखले जाते. या पध्दतीमध्ये एक मुलभूत सत्य

माहिती असेल तर त्या आधारे दुसऱ्या मुलभूत सत्याचा शोध घेता येतो. निगमनात्मक पध्दतीत सर्वप्रथम घटनांचे संपूर्ण ज्ञान प्राप्त केले जाते आणि मिळालेल्या माहितीच्या आधारावर निष्कर्ष काढले जातात. त्यामुळे त्याचा विचार स्वीकार करण्यास अडचण येत नाही. म्हणजेच या पध्दतीमध्ये दोन घटकातील कार्यकारण भाव समजुन घेण्यापासून तर त्या कारणांचा इतर कारणांसोबत एकूण परिणामात त्या विशिष्ट घटकाचा काय प्रभाव पडला याचा शोध घेण्यात येतो. या पध्दतीनूसार काही निश्चित गुहीतकाचा आधार घेऊन सर्वसामान्य नियम प्रस्थापीत केले जातात. ते नियम विशिष्ट घटनेला किंवा परिस्थितीला लागू केले जातात. उदाहरणार्थ उपभोक्ता महत्तम साधन मिळविण्यासाठी आपले उत्पन्न खर्च करतो. हे विशेष तत्व असले तरी उपभोक्ता हा विवेकनिष्ठ असतो व तो महत्तम समाधान प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करतो. या सामान्य तत्वांवर ते आधारलेले आहे. तसेच दुष्काळी भागातील लोक रोजगार मिळविण्यासाठी इतरत्र स्थंलातर करतात. हा सामान्य निष्कर्ष असल्यास कोणत्याही विशिष्ठ गावात दुष्काळ पडल्यास त्या गावातील लोक रोजगारासाठी इतरत्र स्थलांतर करतील असा निष्कर्ष काढता येईल.

या पध्दतीमध्ये सिध्दांत मांडताना विशिष्ट परिस्थिती गृहीत धरली जाते. हि परिस्थिती स्थल, काल निरपेक्ष असते. याचा अर्थ कोणत्याही ठिकाणी कोणत्याही काळात कोणत्याही व्यक्तिला लागु पडणारी असते. याचा अर्थ गृहीत धरलेली गृहीतके नेहमीच खरी ठरणारी असतात. या पध्दतीचा उपयोग ॲडम स्मिथ, रिकार्डो, सिनियर जे. एस. मिल, रॉबिन्स इत्यादींनी अर्थशास्त्रज्ञांनी केला. आर्थिक घटनांच्या विश्लेषणाकरिता निगमन पध्दतीचा उपयोग सर्वप्रथम रिकार्डो या अर्थशास्त्रज्ञाने केला.

प्रत्यक्षात निगमनात्मक पध्दतीचा उपयोग हा सर्व आर्थिक नियमनासाठी करता येतो. प्रा. मिल यांनी या पध्दतीचा उपयोग आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिध्दांतात करतांना अगदी सोप्या गृहीत परिस्थितीपासुन सुरूवात केली. नतंर त्यानी अधिकधिक गुंतागुंतीचे विश्लेषण करून आंतरराष्ट्रिय व्यापाराचा संपुर्ण सिध्दांत स्पष्ट केला. या पध्दतीत (Hypothetical) विवेचनाला अशा गुहीतकापासुन प्रारंभ करतो की, जी गृहीते प्रत्यक्षात आढळून येत नाहीत. परंतू ती गृहीते प्रत्यक्ष परिस्थितीच्या अगदी निकट असतात. त्यामुळे आपणास त्या आधारावर निष्कर्ष काढता येतात.

**निगमन पध्दतीच्या पायऱ्या :–**

**अ) प्रश्नांची निवड** :– प्रश्नाची निवड करतांना जो प्रश्न चौकशीसाठी निवडण्यात येणार आहे. त्याचे स्वरूप स्पष्ट असावे. प्रश्न जेवढा संकुचित व अल्प विस्तृत असतो. तेवढी त्यांची चौकशी करणे सोपे असते. उदा. बेकारी, दारिद्रय, चलनातील वाढ, चलनातील घट इ.

**ब) अनुमानाची रचना** : अनुमानाची रचना ही गृहीतकांचा पाया असते. आर्थिक संशोधनासाठी गृहितकांचे एकापेक्षा अधिक संच असतात त्यामुळे अनुमानाची रचना निश्चित करावी.

**क) गृहीतकांची मांडणी** : अनुमानाच्या आधारावर गृहीतकांची मांडणी करणे हि पुढची पायरी असते यासाठी तर्कशुध्द पध्दती व गणिती पध्दती या दोन पध्दतीचा वापर केला जातो.

**ड) गृहीतकाची सत्यता पाहणे** : निगमन पध्दतीतील शेवटचा टप्पा म्हणजे गृहीतकाची सत्यता निश्चित करणे होय. निरिक्षण व प्रयोगाने गृहीतक सत्य किंवा असत्य आहे ते तपासले जाते. अर्थशास्त्र हे मानवी वर्तनुकीशी संबधीत असल्याने गृहीतकाचे निरिक्षण व परीक्षण करणे कठीण असते. निगमनात्मक पध्दतीच्या सरलता या गुणामुळेच या पध्दतीचा उपयोग अर्थशास्त्राच्या विकासाच्या प्रांरभीच्या अवस्थेत करण्यात आला. या पध्दतीत कोणताही निष्कर्ष काढतात निष्पक्ष व कोणताही भेदभाव न करता काढले जात असल्यामुळे येणारे सर्वसामान्य निष्कर्ष हे सत्याच्या आधारावरचे असतात. त्यासोबतच या पध्दतीत गणिती पध्दतीचा उपयोग केला जात असल्यामूळे हे निष्कर्ष अधिक योग्य व स्पष्ट असण्यासोबत ते अधिक वास्तवादी असतात. अर्थशास्त्रात मनुष्याच्या व्यवहाराचे अध्ययन केले जात असल्यामुळे मनुष्याच्या सामाजिक अध्ययनासाठी ऐतिहासिक तथ्ये उपलब्ध नसतील किंवा पुरेशी नसतील तर हि पध्दती उपयूक्त ठरते.

***संदर्भ सूची :–***


1) *माहोरे रामदास, अर्थशास्त्राचे सिध्दांत, साई ज्योती पब्लीकेशन्स, नागपूर, 2016*
2) *डॉ. झामरे जी. एन., सुक्ष्म अर्थशास्त्रः भाग 2, पंपळापूरे ॲड पब्लीशर्स नागपूर, 2016*
3) *राणा के. सी. आणि वर्मा,समष्टी आर्थिक विश्लेषण, विशाल पब्लीशिंग कं. जालंदर, दिल्ली.*
5) *डॉ. डी. व्ही. मुळे, सुक्ष्म लक्षी आर्थिक विश्लेषण, प्रकाशक दुर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.*
6) *आगलावे प्रदिप, संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, पुणे.*